# GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

(Registration No: NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DATED 05/09/2024)
PLOT NO. 4, NL-5, BUILDING NO : 7 TO 12, SECTOR-3, NERUL, NAVI MUMBAI 400 706.

Ref No. GCHSLTD/065 | विशेष सर्व साधारण सभा - ०१/२०२५ | Date : 15/04/2025

## इतिवृत्तांत

गंगोत्री सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या), संस्थेच्या व्यवस्थापकीय समिती आणि पुनर्विकास समिती ह्यांची संयुक्तिक सभा शनिवार, दिनांक २९ मार्च २०२५, अन्वये, संस्थेच्या सर्व सभासदांची विशेष सर्व साधारण सभा रविवार दि. १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता संत श्री गजानन महाराज मंदिर, बँक्वेट हॉल, प्लॉट क्र. १७, सेक्टर-२९, नेरुळ बस डेपो , नेरुळ (पूर्व)-४०० ७०६ ह्या ठिकाणी पार पडली.

संस्थेची सभासद संख्या : ८८
गणपूर्ती साठी आवश्यक सभासद संख्या : ५९
सभेस उपस्थित सभासद संख्या : ६०

सभेच्या निर्धारित समयी गणपूर्ती अभावी सभा अर्धा तास तहकूब करण्यात आली तदनंतर काहीच वेळात गणपूर्ती झाल्याने सभा सुरु करण्यात आली.
आजच्या विशेष सर्व साधारण सभेचे अध्यक्ष पद श्री. विशाल निकम ह्यांनी भूषवावे असे संस्थेचे अध्यक्ष श्री. गौतम पांडे ह्यांनी सुचविले असता सर्व सभासदांनी त्यास अनुमोदन दिले. त्यांनी सभेचे अध्यक्ष पद स्विकारले.

**सभेमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.**

१. मागील विशेष सर्वसाधारण सभेने संस्थेच्या इमारतींचा पुनर्विकास करणे बाबत आणि आजतागायत संस्थेने घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेऊन संस्थेचे अस्तित्व कायम ठेवून संस्थेच्या इमारतींचा पुनर्विकास करणे बाबत ठराव निश्चिती करून मंजुरी देणेबाबत.

**ठराव** : उपरोक्त विषयास अनुसरून संस्थेने मागील विशेष सर्व साधारण सभेमध्ये घेतलेल्या निर्णयाचा आणि ततपश्च्यात्त त्या निर्णयाच्या अंमलबजावणी साठी, संस्थेच्या व्यवस्थापकीय समिती आणि पुनर्विकास समिती ने केलेल्या कार्याचा आढावा संस्थेचे अध्यक्ष ह्यांनी PPT द्वारे

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DT 05/09/2024 NAVI MUMBAI

Gpandey [signature] [signature]

Ref No. Date :

उत्कृष्ट सादरीकरण केले आणि मागील विशेष सर्व साधारण सभेमध्ये संस्थेचे अस्तित्व कायम ठेवून संस्थेच्या इमारतींचा पुनर्विकास करणे बाबत ठराव निश्चिती च्या ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सूचक : श्री. मंगेश वेलू
अनुमोदक : श्रीमती. शकीला बानो
ठराव सर्वानुमते मंजूर!

तदनंतर सभेची पुढील प्रक्रिया कायदेशीर राबविण्यासाठी संस्थेने कायम केलेले कायदेशीर सल्लागार ह्यांना आमंत्रित करण्यात आले.

२. पुनर्विकासकामी वास्तूविशारद / प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत आजतागायत संस्थेने केलेल्या कार्याचा आढावा घेऊन खालील :-

(१) मे. डायमेन्शन आर्किटेक्टस प्रायव्हेट लिमिटेड, -१२० (Merit 1)
(२) मे. अर्बन अनालिसिस आणि सोलुशन -९८ (Merit 2)
(३) मे. लीलाधर परब आर्किटेक्टस अँड डिझायनर, -८५ (Merit 3)

उमेदवार पैकी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्ती आणि मंजुरी देणेबाबत,

विषयास अनुसरून संस्थेचे कायदेशीर सल्लागार ह्यांनी संस्थेच्या व्यवस्थापकीय समिती आणि पुनर्विकास समिती ने केलेल्या प्रसिद्ध केलेल्या निविदा प्रक्रिया, छाननी प्रक्रिया आणि चयन प्रक्रिया ह्याबाबत विस्तृतपणे चर्चा करण्यात आली. आणि त्याआधारे व्यवस्थापकीय समिती आणि पुनर्विकास समिती मेरिट क्र. १ - डायमेंशन आर्किटेक्टस ह्यांना संस्थेचे प्रकल्प सल्लागार म्हणून निवड करण्यासाठी शिफारस करीत असून सभागृहाची सहमती मागण्यात आली.

त्यावेळी सभागृहाने ह्या तीनही इच्छुक उमेदवारांचे, नियोजित प्रकल्पाचे सादरीकरण (प्रेझेंटेशन ) सभागृहापुढे करण्यात यावे त्यानंतर सभागृह विषयाला मंजुरी देऊ शकेल असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DT 05/09/2024 NAVI MUMBAI

Ref No. Date :

सभेची परवानगी घेऊन तिन्ही उमेदवारांना प्रेझेंटेशनसाठी आमंत्रित करण्यात आले. प्रेझेंटेशनसाठी उमेदवार हजर होईपर्यंत सभासदांनी जेवण उरकावे त्यासाठी सभा अर्धा तास स्थगित करण्यात आली.

जेवणानंतर दुपारी ०२.२५ वाजता त्याच ठिकाणी सभेला पुनश्च्य सुरुवात करण्यात आली. आणि सभागृहाच्या मागणीनुसार तिन्ही उमेदवारांचे अनुक्रमे :

१) मे. डायमेंशन आर्किटेक्टस प्रायव्हेट लि.

२) मे. लीलाधर परब आर्किटेक्ट अँड डिझायनर

३) मे. अर्बन अनालिसिस अँड सोल्युशन्स

सभागृहाने स्वागत करून सादरीकरण (प्रेझेंटेशन) साठी पुरेसा वेळ घेऊन त्याबाबत प्रश्न विचारून समजून घेतले.

तदनंतर, संस्थेचे कायदेशीर सल्लागार ह्यांनी सभासदांनी ह्या प्रक्रियेसाठी दिलेला अमूल्य वेळ आणि दाखविलेला संयम ह्यासाठी सर्व सभासदांचे आभार व्यक्त करीत पुढील निर्णय प्रक्रिये साठी सभागृहाची परवानगी मागितली असता सर्व सभासदांनी पुढील निर्णय प्रक्रिया करण्यात यावी ह्यासाठी टाळ्यांच्या गजरात अनुमोदन दिले.

निवड प्रक्रियेचा अंतिम टप्पा म्हणून तिन्ही उमेदवारांचे त्यांच्या निविदेमध्ये नमूद मानधन (फी) अनुक्रमे :-

१) मे. डायमेंशन आर्किटेक्टस प्रायव्हेट लि. - ०१% (कंस्ट्रक्शन कॉस्ट)

२) मे. लीलाधर परब आर्किटेक्ट अँड डिझायनर - ०१.४५% (कंस्ट्रक्शन कॉस्ट)

३) मे. अर्बन अनालिसिस अँड सोल्युशन्स - ०२.५ %(कंस्ट्रक्शन कॉस्ट)

अशी माहिती सभागृहाकडे ठेवण्यात आली. तसेच सभासद निर्णय घेण्यास सक्षम आहेत ह्याची खातरजमासुद्धा करण्यात आली.

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DT 05/09/2024 NAVI MUMBAI

# GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

(Registration No: NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DATED 05/09/2024)

PLOT NO. 4, NL-5, BUILDING NO : 7 TO 12, SECTOR-3, NERUL, NAVI MUMBAI 400 706.



Ref No. Date

अशाप्रकारे सर्व निकषावर साधक बाधक चर्चा झाल्यानंतर **मे. डायमेंशन आर्किटेक्टस प्रायव्हेट लि.** ह्या फर्म ला सर्वाधिक बहुमताने निवड करण्यात आली.

ठराव: सदर विशेष सर्व साधारण सभा संस्थेच्या पुनर्विकासकामी, संस्थेचे प्रकल्प सल्लागार म्हणून **मे. डायमेंशन आर्किटेक्टस प्रायव्हेट लि.** ह्यांना निवडण्याच्या ठरावाला बहुमताने मंजुरी देण्यात आली.

सूचक : श्री. सुरेश गोपाळ शेट्टी

अनुमोदक : श्री. सुनील कुमार घोष

**ठराव सर्वानुमते मंजूर!**

३ : पुनर्विकासकामी सभासदांची/सदनिकाधारकांची पात्रता यादीची निश्चिती करणेबाबत, सभासदांचे मालकी हक्काच्या दस्त संबंधित काही मार्गदर्शन हवे असल्यास संस्थेचे कायदेशीर सल्लागार ह्यांच्याशी संस्थेमार्फत संपर्क केल्यास मोफत मार्गदर्शन केले जाईल अशी माहिती सभासदांना देण्यात आली.

अखेर शेष विषय नसल्यामुळे सर्व उपस्थित सभासदांनी अशाच प्रकारे विशेष सर्व साधारण सभेमध्ये सक्रिय सहभाग घेऊन पुनर्विकास कामी सहकार्य करण्याचे आवाहन केले आणि सभासदांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे समापन करण्यात आले.

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED (NBOM/CIDCO/HSG/(T. C)/10344/DR/2024-2025 DT 05/09/2024, NAVI MUMBAI)

GANGOTRI CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED

CHAIRMAN SECRETARY TREASURER

प्रति :-

१. सर्व सभासद

२. उपनिबंधक सहकारी संस्था (सिडको)